**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः 21.06.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **योग मानवाच्या जीवनाचा चेतना, ऊर्जेसोबत एक प्रकाश देखील असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन. १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देश-विदेशात योगाभ्यासाचं आयोजन**
- **वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या नीट युजी परीक्षेसाठी यंत्रणा सज्ज**
- **महाराष्ट्रातल्या सहकार क्षेत्रासाठी तीन हजार कोटी रुपयांच्या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घोषणा**
- **आणि**
- **एफआयएच महिला हॉकी स्पर्धेत आज भारत आणि न्यूझीलंडदरम्यान अजिंक्यपदाची लढत**

**आंतरराष्ट्रीय-योगदिवस**
संपूर्ण देश योगाच्या चैतन्यानं ऊर्जेनं भारलेला असून, ही योगाची शक्ती असल्याचं असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आजचा दिवस जगभरात उत्सवाचा दिवस असल्याचं त्यांनी सांगितलं. कोलकात्याच्या ऐतिहासिक रेड रोडवर झालेल्या योगदिनाच्या मुख्य कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर ते बोलत होते. पश्चिम बंगालमध्ये लाखो लोकांनी या कार्यक्रमात प्रत्यक्ष आणि दूरस्थ पद्धतीनं सहभागी होऊन मोदी यांच्यासोबत योगाभ्यास केला.
योग स्वभावामध्ये येतो तेव्हा मानवीय एकतेचा आधार बनतो. केवळ शारीरिक श्रमाचं साधन नव्हे तर योग मानवाच्या जीवनाचा चेतना, ऊर्जेसोबत एक प्रकाश देखील आहे. म्हणूनच यावर्षीची संकल्पना वयोवृद्ध होत असताना आपण निरोगी, ऊर्जावान सक्रीय राहू शकतो, योग यासाठी आपल्याला मार्ग दाखवू शकतो असंही मोदी यांनी सांगितलं.

ते पुढं म्हणाले...
**योग किसी एक आयु: वर्ग के लिए सीमित भी नही है। भारत में हम जानते है और देखते आये है योग मानव के जीवन का चेतना के साथ, ऊर्जा के साथ, एक प्रकाश भी है। इसलिये इस वर्ष आंतरराष्ट्रीय योग दिवस की थीम रखी गई है योगा फॉर हेल्दी एजिंग। उम्र बढने पर भी हम स्वस्थ रह सकते है। हम ऊर्जावान और सक्रिय रह सकते है। योग हमे इसके लिए मार्ग दिखाता है।**

‘निरामय वार्धक्यासाठी योग’ या संकल्पनेसह १२वा ‘आंतरराष्ट्रीय योग दिवस’ आज जगभरात साजरा होत आहे. जगभरात २१० पेक्षा अधिक भारतीय दूतावासांसह सुमारे अडीच हजार ठिकाणी योग प्रात्यक्षिकांचं आयोजन करण्यात आलं होतं. यानिमित्त्य नवी दिल्ली, मुंबईसह देशातल्या प्रमुख शंभर ठिकाणी सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे विशेष योग कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मध्य प्रदेशात जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

**<u>पंतप्रधान-नौदल नौका</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज कोलकाता इथं भारतीय नौदलाच्या तीन स्वदेशी बनावटीच्या नौका, आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय यांचं लोकार्पण होणार आहे. नौदलाच्या वॉरशिप डिझाइन ब्युरोनं तयार केलेल्या आणि गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्सनं बांधलेल्या या नौका लढाऊ कारवाया, जलसर्वेक्षण आणि पाणबुडीविरोधी युद्धतंत्र मजबूत करण्याच्या उद्देशानं बांधण्यात आल्या आहेत. या नौकांमध्ये ७५ टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्री असून, यात २०० हून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा सहभाग आहे, असं नौदलानं म्हटलं आहे.

**<u>नीट यूजी</u>**

देशातल्या ५५१ आणि परदेशातल्या १४ शहरांमधे आज दुपारी दोन ते सव्वा पाच या वेळेत होणारी नीट यूजी फेरपरीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीतपणे पार पडावी, यासाठी एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं जय्यत तयारी केली आहे. याची पूर्वतयारी म्हणून काल देशभरातील परीक्षा केंद्रांवर सराव प्रात्यक्षिक करण्यात आलं होतं. २२ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत. देशभरातल्या परीक्षा केंद्रांवर पोलीस, प्रशासकीय कर्मचारी, निरीक्षक आदी दोन लाख कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसंच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत, विद्यार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी आधार कार्ड आधारित बायोमेट्रिक बसवले आहेत, प्रश्नपत्रिका तसंच परीक्षेच्या इतर साहित्याची ने आण करण्यासाठी जीपीएस बसवलेल्या पोलिसांच्या वाहनांची सोय करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र असलेल्या जिल्ह्यांमधे कठोर उपाययोजना करण्यात आल्या असून, देखरेख करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे

**<u>हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.</u>**

**<u>अमित शहा</u>**

पश्चिम महाराष्ट्रातल्या सहकार आणि साखर उद्योगाला बळ देण्यासाठी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी तीन हजार कोटी रुपयांच्या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची घोषणा केली. कोल्हापूर जिल्ह्यातल्या इचलकरंजी इथं कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीचं उद्घाटन काल शहा यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे

१५०० कोटी रुपयांचा सहकारी प्रक्रिया सामूहिक प्रकल्प, तर पुण्यातील बंद पडलेले नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह पुनरुज्जीवित करण्यासाठी आणखी १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर देशासह जगभरातल्या साखर कारखान्यांना आवश्यक असलेली यंत्रसामग्री तयार करण्याचे काम याठिकाणी केलं जाणार आहे. दरम्यान, दक्षिणकाशी म्हणून ओळखलं जाणारं करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर आणि परिसर, शासन १५ शे कोटी रुपयांचा निधी खर्चून, विकास कॉरीडॉर म्हणून विकसित करत आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याची भावना शहा यांनी कोल्हापूर इथं व्यक्त केली.

**<u>होर्मुझ-इराण</u>**

लेबनॉनमधील इस्त्राईलच्या हल्ल्यांमुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद करण्यात आल्याचं  इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने काल जाहीर केलं. ही  आक्रमक कारवाई सुरू राहिल्यास पुढील उपाययोजनांचीही तयारी करण्यात आल्याचा इशारा इराणनं दिला आहे. दरम्यान, दक्षिण लेबनॉनमध्ये इस्त्राइलच्या हवाई हल्ल्यांमध्ये किमान १६ जणांचा मृत्यू झाला आहे.

**<u>अमेरिका-इराण चर्चा</u>**

इराणच्या या इशाऱ्यानंतर काही तासांतच, अमेरिका आणि इराणचे प्रतिनिधी चर्चेसाठी स्वित्झर्लंडला रवाना झाले आहेत. तर इराणच्या इशाऱ्याला प्रत्युत्तर म्हणून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६० दिवसांच्या आत इराणसोबत अंतिम करार झाला नाही, तर या महत्त्वपूर्ण जलमार्गावरून जाणाऱ्या जहाजांवर अमेरिकेकडून शुल्क आकारले जाईल, असा इशारा दिला आहे. इराण आणि अमेरिकेतील चर्चेत अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स, तर इराणच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व मोहम्मद बागेर कलिबाफ करत असून, त्यात परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची यांच्यासह मध्यवर्ती बँक आणि तेल क्षेत्रातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<u>सोनोवाल – टँकर</u>**

होर्मुझ सामुद्रधुनीतून तीन कच्चे तेल वाहून नेणारे टँकर काल भारताच्या दिशेने यशस्वीरित्या मार्गस्थ झाल्याचं केंद्रीय बंदरे, जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. हे तीन टँकर  ८ लाख ६ हजार मेट्रिक टनांहून अधिक कच्चे तेल आणत असून, त्यावर ९४ भारतीय कर्मचारी आहेत, असं त्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>वैष्णव- राजस्थान</u>**

राजस्थानमधील अनेक महत्त्वाच्या रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन आणि लोकार्पण  आज रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे. बिकानेर रेल्वे स्थानकावरून ते 'लालगड-साबरमती एक्सप्रेस'ला हिरवा झेंडा दाखवून रवाना करतील. त्यानंतर ते जयपूर इथं खातीपुरा रेल्वे स्थानकावर 'जयपूर-दरभंगा अमृत भारत एक्सप्रेस'ला हिरवा झेंडा दाखवतील. यावेळी 'मेगा कोच टर्मिनल'चं उद्घाटनही ते  करतील. उत्तर पश्चिम रेल्वेने विकसित केलेल्या प्रवाशांसाठीच्या अनेक पायाभूत सुविधा

प्रकल्पांचं लोकार्पणही ते करणार आहेत. यामध्ये ४१ लहान आणि मध्यम स्थानकांवरील नवे प्लॅटफॉर्म, प्लॅटफॉर्मचा विस्तार आणि सुधारणांची कामे,  १६ स्थानकांवरील 'एकात्मिक प्रवासी माहिती प्रणाली' चा समावेश आहे.

**<u>राजनाथ सिंह- मेघालय</u>**

मेघालयातील शिलाँग इथं असलेल्या हवाईदलाच्या पूर्व मुख्यालयात केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल सैनिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी तांत्रिक तत्परता, धोरणात्मक दूरदृष्टी आणि संस्थात्मक नावीन्यपूर्णतेच्या आवश्यकतेवर भर दिला.
सध्याच्या जागतिक व्यवस्थेतील अनिश्चिततेच्या काळातही भक्कम सज्जता राखणे किती महत्त्वाचे आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. युद्धाचं स्वरूप सतत बदलत आहे आणि यात हायब्रिड धोके, सायबर आव्हानं, माहिती-युद्ध, पुरवठा साखळीची सुरक्षा आणि ड्रोन हे घटक अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत; अशा परिस्थितीत संरक्षण दलांसाठी केवळ पारंपरिक सज्जता पुरेशी नाही. आपल्या स्वतःच्या अटींवर राष्ट्रीय सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारतानं 'आत्मनिर्भरता' साध्य करणं गरजेचं आहे, असंही राजनाथसिंह यांनी नमूद केलं.

**<u>एफआयएच महिला हॉकी</u>**

न्यूझीलंडमध्ये ऑकलंड इथं सुरू असलेल्या एफआयएच महिला हॉकी स्पर्धेत काल भारतानं चिलीचा सहा विरुद्ध शून्य गोलनं एकतर्फी पराभव करत या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. आज होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत यजमान न्यूझीलंडच्या संघाबरोबर होणार आहे.  न्यूझीलंडनं अमेरिकेचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**